# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १९०** **दिनांक १३/०७/२०२१**

## घरफोडी चोरी करणारे तीन आरोपी अटकेत, एकुण ८ गुन्हे ऊघडकीस करुन १३,५५,९८०/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात विरार पोलीस स्टेशनला यश.

दिनांक ०१/०७/२०२१ रोजी १६:०० वा ते दिनांक ०२/०७/२०२१ रोजी ०९.३० वा. च्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी 'श्री साई पुर्णानंद ट्रेड्रर्स' या गाळ्यामध्ये ठेवलेले २,४०,००० /- रुपये किंमतीचे लसुण (५० किलो वजनाच्या एकुण ६० लसणाच्या गोणी प्रत्येकी गोणी ४००० रुपये किंमतीची) घरफोडी करुन चोरुन नेल्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादिवरुन विरार पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ५६४/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचे तपासादरम्यान विरार पोलीस स्टेशनचे गुन्हे प्रकटिकरण पथकाने आरोपींची गुन्हा करण्याची कार्यपध्दती, उपलब्ध तांत्रिक बाबींचा कौशल्यपुर्ण वापर व बातमीदाराने दिलेल्या माहितीवरुन तीन आरोपींना धानीव तलावाच्या पाठीमागील चाळ, नालासोपारा (पू.) येथून ताब्यात घेवून त्यांच्याकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने विचारपूस केली असता सदर आरोपीतांचा गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न झाल्याने आरोपी नामे १) राकेश भादई यादव, वय ३७ वर्षे, सध्या राहणार साडी कंपनीच्या मागे असलेल्या रुममध्ये, धानीव तलाव, नागोरी नाका, नालासोपारा पुर्व, मुळ राहणार गाव दलीतपुर्वा, पोस्ट भिटोरा, पोलीस ठाणे मनकापुर, जिल्हा गोंडा, राज्य उत्तरप्रदेश, २) राजेश बबन कदम, वय ३३ वर्षे, सध्या राहणार साडी कंपनीच्या मागे असलेल्या रुममध्ये, धानीव तलाव, नागोरी नाका, नालासोपारा पुर्व, मुळ राहणार रुम नं १०१, सेफ्टी बिल्डींग, बाबरीका नगर, चारकोप, कांदीवली पुर्व, मुंबई, ३) विकासकुमार संतोषकुमार दुबे, वय ३६ वर्षे, सध्या राहणार साडी कंपनीच्या मागे असलेल्या रुममध्ये, धानीव तलाव, नागोरी नाका, नालासोपारा पुर्व, मुळ राहणार गाव तिलंगा, पोस्ट गोपीगंज, पोलीस ठाणे ज्ञानपुर, जिल्हा संत रवीदास नगर, राज्य उत्तरप्रदेश अशांना अटक करण्यात आली आहे.

यातील अटक आरोपी हे अभिलेखावरील सराईत गुन्हेगार असून लसुन, कांदा, मसाले, सुका मेवा तसेच दैनंदिन वापरातील वस्तुंची चोरी करण्याची त्यांची कार्यपध्दती आहे. त्याकरीता दिवसाच्या वेळी परीसरामध्ये फिरुन रेकी करणे आणि रात्रीच्या वेळी कटावणी, स्क्रु-ड्रायव्हरच्या सहाय्याने गाळा किंवा दुकानाचे शटर तोडून त्यामध्ये असलेला माल सोबत आणलेल्या टेम्पो, पिकअप मध्ये भरुन चोरुन घेवून जाणे अशापध्दतीची सदर आरोपीतांची चोरी करण्याची सवय आहे.

अटक आरोपीतांकडून सदर गुन्हयात चोरीस गेलेला माल व चोरी करण्यासाठी वापरलेले वाहने असे खालीलप्रमाणे हस्तगत करण्यात आला आहे.

१) २,४०,०००/- रु कि चे ६० गोणी लसुन (१००% हस्तगत)

२) ८,००,०००/- रु.कि. ची महिंद्रा बोलेरो पिकअप क्र. एमएच-४८-बीएम-७२७८

३) ४०,०००/- रु.कि. ची होंडा ॲक्टीव्हा क्र. एमएच-०२-सीक्यू-२६९५

------------------

१०,८०,०००/- रुपये एकुण

**इतर ऊघडकीस आलेले गुन्हे आणि जप्त मुद्देमालः**

१. विरार पोलीस ठाणे गु. र.क्र. ४१२/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८०, ३४
२. विरार पोलीस ठाणे गु..र.क्र. ४३१/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८०, ३४
३. विरार पोलीस ठाणे गु.र.क्र. १०११/२०२०, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८०, ३४
४. भिवंडी तालुका पोलीस ठाणे गु.र.क्र. २५०/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८०, ३४
५. गणेशपुरी पोलीस ठाणे गु..र.क्र. १२८/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८०, ३४
६. गणेशपुरी पोलीस ठाणे गु.र.क्र. १२९/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८०, ३४
७. वाडा पोलीस ठाणे गु.र.क्र. १९२/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८०, ३४

उपरोक्त नमुद गुन्ह्यामध्ये एकुण २,७५,३४५/- रुपये किंमतीचा मुद्देमाल आरोपी यांनी चोरी केलेला माल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ-३, श्रीमती रेणुका बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली विरार पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुरेश वराडे, गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोउपनि. अभिजीत भुपेंद्र टेलर, संदेश राणे, पो.हवा. सचिन लोखंडे, पो.ना. विजय दुबळा, हर्षद चव्हाण, भुषण वाघमारे, संदिप शेरमाळे, पो.शि. सुनिल पाटील, इंद्रनिल पाटील, विशाल लोहार, रवी वानखेडे, सागर घुगरकर, पवन पवार यांनी केली आहे.

*********